# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 12.06.2024** **वार – बुधवार**

---

**उद्योग**

सातत्यानं होणारी वाहतुकीची कोंडी त्याचबरोबर अन्य स्वरूपाच्या पायाभूत सुविधांचा अभाव यामुळं हिंजवडी परिसरातून 37 उद्योग समूहांनी अन्यत्र स्थलांतर केल्याचा स्थानिक उद्योजक संघटनेचा दावा राज्य औद्योगिक विकास महामंडळानं फेटाळून लावला आहे. तसं काही घडलं असल्यास त्याचे पुरावे संघटनेनं सादर करावेत असं महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी म्हटलं आहे. या परिसरात वाहतूक कोंडी होत असली तरी कोणत्याही उद्योग समूहाकडून त्यासाठी तक्रार आलेली नाही असं स्पष्टीकरण औद्योगिक महामंडळाकडून देण्यात आलं आहे. सध्या या परिसरात सुमारे शंभर उद्योग समूह कार्यरत आहेत.

**अवैध**

पुणे शहरातील अनधिकृत व्यवसाय बंद करण्याचे आदेश पोलीस आयुक्त अमितेष कुमार यांनी दिले असून, यासाठी गुन्हे शाखेची 13 पथकं तयार करण्यात आली आहेत. या पथकांनी काल केलेल्या कारवाईत तंबाखू, तंबाखूजन्य पदार्थ आणि इतर वस्तू जप्त केल्या.

**कॉलरा**

पिंपरी शहरातील भोसरी परिसरात कॉलराचे दोन रूग्ण आढळले आहेत. या दोन्ही रूग्णांवर महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. तर, तिघांचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत असं वैद्यकीय अधिकारी डॉक्टर लक्ष्मण गोफणे यांनी सांगितलं. भोसरीच्या धावडे वस्तीमध्ये एका नागरिकानं नळजोडणी घेताना खबरदारी न घेतल्यामुळं दूषित पाणी पुरवठा होऊन या दोन रुग्णांना कॉलराची लागण झाल्याचा संशय आहे.

**ससून**

ससून रुग्णालयातील काही डॉक्टरांनी खासगी औषध विक्रेत्यांसोबत मिळून गरीब रुग्णांकडून पैसे घेतल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. रुग्णांची शस्त्रक्रिया योजनेतून मोफत झालेली असताना रुग्णांच्या नातेवाइकांना खासगी दुकानामधून औषधं, शस्त्रक्रियेचं साहित्य खरेदी करण्यास सांगत न्युरोसर्जरी विभागातील एका निवासी डॉक्टरनं 24 हजार 500 रुपयांची मागणी केल्याचा व्हिडीओ समोर आला आहे. या प्रकरणाची तातडीनं चौकशी करण्यासाठी डॉक्टर मुरलीधर तांबे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे.

**डास**

पुणे महापालिका आरोग्य विभागाच्या वतीनं 15 क्षेत्रीय कार्यालयांमार्फत डासोत्पत्ती स्थानं शोधून ती नष्ट करण्याची मोहिम सुरू आहे. कीटकजन्य आजारांचा प्रसार होवू नये यासाठी नागरिकांनी घरातील सर्व पाणीसाठे झाकून ठेवावे, घरं आणि छतावरील भंगार आणि निरुपयोगी साहित्य काढून टाकावं असं आवाहन आरोग्य विभागाच्या वतीनं करण्यात आलं आहे. डासोत्पती निर्माण करणारे नागरिक, व्यवसायिक, आस्थापनांवर कारवाई करण्यात येणार आहे.

**<u>उपक्रम</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि स्मार्ट सिटी कंपनीच्या वतीनं ईझीपेडल पब्लिक राईडशेअर या महत्त्वाकांक्षी सार्वजनिक उपक्रमाची घोषणा करण्यात आली आहे. या उपक्रमामध्ये सौर पॅनेलद्वारे चालणारे स्मार्ट डॉक स्थापित करण्यात येणार आहेत. या प्रकल्पाच्या माध्यमातून शहरातील सायकल ट्रॅकचा वापर वाढेल अशी अपेक्षा आहे.

**<u>पूर</u>**

पुणे महापालिकेनं आगामी पाच वर्षांसाठी पूर व्यवस्थापन आराखडा तयार केला असून, पूरस्थिती रोखण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजनेची कामं करण्यासाठी पाटील कन्स्ट्रक्शन अँड इंफ्रास्ट्रक्चर लिमिटेड कंपनीच्या 97 कोटी 94 लाख रुपयांच्या निविदेला स्थायी समितीनं मान्यता दिली आहे. प्रमुख नाले खोल करून पुराचा धोका कमी केला जाणार आहे. शहराच्या विविध भागात जलवाहिन्या टाकून पूरस्थिती रोखण्यासाठी विविध कामं केली जाणार आहेत.

**<u>गटारे</u>**

पुणे शहरात अलिकडच्या अति मुसळधार पाऊस झालेल्या भागाची खासदार सुप्रिया सुळे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी आज पाहणी केली. मोठ्या पावसानंतर पाणी सोडून होणाऱ्या नुकसानाबाबत त्यांनी चिंता व्यक्त केली.

**<u>पिंपरी चिंचवड</u>**

मान्सून काळात संभाव्य आपत्कालीन परिस्थिती लक्षात घेता पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीनं क्षेत्रीय कार्यालय-निहाय आपत्कालीन व्यवस्थापन पथक स्थापन करण्यात आलं आहे. या पथकाच्या कामकाजाची वेळ रात्री 10 ते सकाळी सहा असेल. सह-आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी या पथकांच्या कामकाजाबाबत क्षेत्रीय कार्यालयांच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

**<u>संस्कृत</u>**

संस्कृत भाषेच्या प्रचार आणि प्रसारासाठी सर्वच शाळांमधून संस्कृतविषयी जागृती केल्यास नव्या पिढीला त्याचं महत्व समजू शकेल असं मत डेक्कन कॉलेजचे कुलगुरु डॉक्टर प्रमोद पांडे यांनी आज पुण्यात श्रीगीता मंजुषामंथनच्या पंचविसाव्या विशेष पुष्प पारितोषिक वितरण कार्यक्रमात व्यक्त केलं. कौशलम् न्यासाच्या पुढाकारातून आणि भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था, भारत विकास परिषद आणि संस्कृत भारती यांनी संयुक्तपणे या कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं.

**<u>पासेस</u>**

पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेडतर्फे पिंपरी चिंचवड शहरातील इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांकरिता अनुदानित पासेसचं वितरण 15 जूनपासून सुरू करण्यात येणार आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**